# संधी मिळणे व क्षमतेचा पूर्ण वापर होणे आवश्यक -कुलगुरू डॉ.पंडीत विद्यासागर

लातूर (दि.९) -येथील संगणकशास्त्र व माहितीतंत्रज्ञान महाविद्यालयात (कॉक्सिट) टीसीएस, विप्रो व रिअल इमेज मिडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या कॅम्पसमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा पालकासमवेत सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात स्वा.रा.ती.म. नांदेडचे कुलगुरू डॉ.पंडित विद्यासागर यांनी विद्यार्थ्यांना संधी मिळणे व क्षमतेचा पूर्ण वापर करून स्वतःचा व समाजाच्या विकासासाठी विद्यार्थ्यांनी प्रयत्न करणे आवश्यक बाब असल्याचे मत व्यक्त केले.

सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात पदवी व पदव्युत्तर वर्गातील अंतीम वर्षात शिकत असणा-या ३६ विद्यार्थ्यांची टीसीएस, विप्रो व रिअल इमेज मिडिया प्रायव्हेट लिमिटेड मध्ये निवड झाल्याबद्दल त्यांचा पालकासमवेत सत्कार समारंभ आयोजीत करण्यात आला. या कार्यक्रमाला पालक उत्साहाने सहभागी झाले. कुणा पालकाच्या डोळ्यात आनंदाश्रू....... तर कुणा विद्यार्थ्याला अपयश येवूनही गुरूजनाकडून मिळालेली प्रेरणा यामुळे मिळालेली उभारी.... याचे स्मरण होवून डोळ्यात आलेले पाणी .... उपस्थितांना असेच भावस्पर्शी दृश्य पहायला मिळाले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात उपप्राचार्य डॉ .एन.एस.झुल्पे यांनी सन २००४ पासून आत्तापर्यंत कॉक्सिटचे १०७ विद्यार्थी विद्यापीठात मेरीट आले असून शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा असल्याची माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणुन बोलताना कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर म्हणाले की, कॅम्पस मुलाखती सर्वसाधारणपणे इंजियरींग कॉलेजमध्ये आयोजीत होतात. असे असताना कॉक्सिटमध्ये शहरी व ग्रामीण अशा दोन्हीसाठी सर्वसमावेशक शिक्षण देण्यात येवून विद्यार्थ्यांना शिकत असतानाच नोक-या मिळत असल्याची बाब आश्वस्त करणारी आहे. प्राचार्य डॉ.एम.आर.पाटील याच्या हस्ते कुलगुरूंना स्वामी विवेकानंद यांची प्रतिमा सस्नेह भेट देण्यात आली. कुलगुरू व प्राचार्य डॉ.एम.आर.पाटील यांच्या हस्ते टीसीएस, विप्रो व रिअल इमेज मिडिया प्रायव्हेट लिमिटेड मध्ये निवड झालेल्या ३६ विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक देवून गौरविण्यात आले.

कु.मृण्मयी कुलकर्णी व अभिलाष कुलकर्णी या विद्यार्थ्यांनी मनोगतात कॉलेजमधील प्रेरणादायी वातावरण, प्लेसमेंट विभागाचे व सर्व गुरूजनांचे मार्गदर्शनामुळे यश मिळाल्याचे सांगितले. पालक प्रतिनिधी श्री. मोरे म्हणाले की, आयुष्यात आई-वडील व गुरू फक्त कोणतीही अपेक्षा न करता आपल्यासाठी प्रयत्न करतात. त्यामुळे त्यांना कधीही विसरू नका. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार कु.अश्विनी बिराजदार या विद्यार्थीनीने व्यक्त केले. व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.एम.आर.पाटील, कुलगुरू डॉ.पंडीत विद्यासागर, उपप्राचार्य डॉ.एन.एस.झुल्पे, टीपीओ प्रा.किशोर जेवे उपस्थित होते.यावेळी शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




कुलगुरू डॉ.पंडीत विद्यासागर मार्गदर्शन करत असताना....,
व्यासपीठावर उपस्थित प्राचार्य डॉ.एम.आर.पाटील,
उपप्राचार्य डॉ. एन.एस.झुल्पे, टीपीओ प्रा.किशोर जेवे